**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>१)</td><td>१८७</td><td>श्री. हरीश मोहन ग्वालबंशी</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>1</td><td>महाराष्ट्र राज्य शासनाकडून सेवा हमी कायदा सन 2015 मध्ये लागू करण्यात आला. या सेवा हमी कायद्या अंतर्गत म.न.पा. करीता कोण–कोणत्या सेवा देण्यात येत आहे व आतापर्यंत म.न.पा. मध्ये या कायद्या अंतर्गत कोणावर कारवाई करण्यात आली आहे का ?</td><td>महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 नुसार नागपूर महानगरपालिकेतर्फे एकूण 49 सेवां देण्यात येत असून दिनांक 05.11.2019 च्या शासन राजपत्रात अधिसुचित करण्यात आलेल्या आहेत.<br>शासन राजपत्राची प्रत सोबत जोडली असून त्यामध्ये नमूद 49 लोकसेवांचा तपशिल, आवश्यक कागदपत्रे, फी, सेवा देणारा पदनिर्देशित अधिकारी, नियत कालमर्यादा, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी इ. तपशिल अधिसुचित करण्यात आला आहे.<br>मनपामध्ये या कायद्या अंतर्गत कोणताही कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.<br>**(मा. आयुक्त यांचे दि. ०५-०२-२०२० च्या अनुमतीने)**</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**हस्ता/- निर्भय जैन**
**उपायुक्त (साप्रवि)**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
| २) | १८८ | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | 1 | 1) महानगरपालिकेने मेसर्स आयटी क्रॅफ्ट टेक्नॉलॉजीस प्रा.लि.ची नियुक्ती कधी करण्यात आली ? | सध्या सुरु असलेल्या निविदेप्रमाणे मेसर्स आय.टी.क्रॅफट टेक्नॉलॉजीस प्रा.लि.यांची नियुक्ती दि. 6.03.2019 रोजी करण्यात आली. |
| | | | 2 | 2) या कंपनीला कोण-कोणत्या कामाकरिता नियुक्त केले आहे? | या कंपनीचे मुख्य कार्य हे नागपूर महानगरपालिकेच्या मॉडर्न कम्युनिकेशन चॅनेलचे व्यवस्थापन करणे आहे. त्या अंतर्गत अधिकृत सोशल मिडीया, न्यूज पोर्टल हॅन्डल करणे आहे. सोशल मिडियाचे विविध टूल वापरुन म.न.पा.चे उपक्रम, योजना आणि विशेष मोहिम सोशल मिडीयाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्याकरीता नियुक्त केले आहे. |
| | | | 3 | 3) यांच्या कामाकरिता दरमहा किती व्यवस्थापन शुल्क मंजूर करण्यात आलेले आहे ? | यांच्या कामाकरिता दरमहा रु. 3,30,000/- (वस्तू व सेवा कर सोडून) व रु. 3,89,400/- (वस्तु व सेवाकर सहित) याप्रमाणे व्यवस्थापन शुल्क स्थायी समिती ठराव क्र.778 दि. 14.02.2019 नुसार मंजूरी दिलेली आहे. |
| | | | 4 | 4) या कपंनीकडून महानगरपालिकेला किती लाभ प्राप्त झाले आहे ? | मे. आय.टी. क्राफ्ट टेक्नॉलॉजीस प्रा.लि. कडून @nmcngp हे मनपाचे अधिकृत फेसबुक पेज तर @ngpnmc हे अधिकृत ट्वीटर हँडल तयार करण्यात आले आहे आणि त्याचे व्यवस्थापनही कंपनीतर्फे करण्यात येते. हे दोन्ही सोशल मीडिया चॅनल ऑफिसीयली व्हेरीफाईड असून दोन्ही चॅनलला ब्ल्यू टिक प्राप्त आहे. सोशल मीडिया वापरकर्त्यांची संख्या पाहता नागपूर महानगरपालिकेच्या विविध योजना, विविध आवाहने, विविध संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे काम सोशल मीडिया चॅनलच्या माध्यमातून होत आहे. स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण, कर आकारणी मोहिम, मातृत्व वंदना योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, अपंग कल्याण योजना, पाणी बचत, डेंग्यू प्रतिबंध, अभय योजना आदीं विषयी विशेष |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | जनजागृती मोहिम सोशल मीडिया चॅनलवरून राबविण्यात येते. आकर्षक क्रिएटिव्ह, न्यूज अपडेट, महत्वांच्या कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण, होणा-या कार्यक्रमांची माहिती हे या सोशल मीडिया चॅनलचे आकर्षण आहे.<br>सोशल मीडियावर येणा-या नागरिकांच्या तक्रारी संबंधित अधिका-यांकडे पाठवून त्यांना उत्तर देउन संवाद साधण्याचे कार्यही या माध्यमातून होते.<br>नागपूर महानगरपालिकेच्या विविध बैठकांच्या, उपक्रमांच्या बातम्या नागरिकांना वाचण्यासाठी मे. आय.टी.क्राफ्ट टेक्नॉलॉजीस प्रा.लि. news.nmcnagpur.org या मनपाच्या अधिकृत न्यूज पोर्टलचेही व्यवस्थापन करते. या व्यतिरिक्त विविध उपक्रमांचे, विभागांना आवश्यक असलेले लोगो, आर्टवर्क, निमंत्रण पत्रिकांचे डिझाईन सुद्धा आय.टी.क्राफ्ट तर्फे तयार करण्यात येते. ‘आपली बस’चा लोगो हा आय.टी.क्राफ्टने तयार केला आहे. ‘स्मार्ट सिटी’च्या वेबसाईटवरील लोगो जो आज मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर अंकित केला आहे. ते डिझाईन सुद्धा आय.टी.क्राफ्टच्या चमूने तयार केले आहे.<br>या व्यतिरिक्त ‘वेब’शी संबंधित विविध कामे आवश्यकतेनुसार आणि मागणीनुसार आय.टी.क्राफ्ट करत असून अनेक विभागाचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सुद्धा मे.आय.टी.क्राफ्टच्या चमूतर्फे तयार करण्यात येत असते.<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १८-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- निर्भय जैन**
**उपायुक्त (साप्रवि)**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ३) | १८९ | सौ. आभा विजयकुमार पांडे | |

| अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | नागपूर महानगरपालिकेतील ज्या कर्मचा—यांनी एल.जी.एस. व एल.एस. जी.डी. परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर वेतनवृध्दी देण्याबाबतचा ठराव झाला असल्यास त्याची सत्य प्रत उपलब्ध करून दयावी, तसेच हा ठराव झाल्यानंतर किती कर्मचा—यांना दोन वेतनवृध्दीचा त्यांचे सेवा पुस्तिकेत नोंद घेवून लाभ देण्यांत आला, त्या कर्मचा—यांची संख्या किती ? | एलजीएस/एल.एस.जी.डी.ची परिक्षा देण्याकरिता ज्या कर्मचा—यांनी कार्यालयाची पुर्व परवानगी घेतली आणि भविष्यात परवानगी घेतील आणि जे ही परिक्षा उत्तीर्ण होतील अशा सर्व महानगरपालिका कर्मचा—यांना 02 अगीम वेतनवृध्दी मंजूर करण्याबाबतचा नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 29.06.1994 च्या विशेष सभेतील ठराव क्र. 81 ची प्रत यासोबत जोडली आहे.<br>एलजीएस/एल.एस.जी.डी उत्तीर्ण कर्मचा—यांना दोन वेतनवृध्दीचे लाभ देण्याबाबतचे प्रस्ताव संबधित विभागामार्फत सादर केले जात होते. मनापाच्या सर्व विभागांकडून प्राप्त माहितीनुसार हा ठराव झाल्यानंतर एकुण 58 कर्मचा—यांना वेतनवृध्दीचा लाभ देण्यात आला. |
| 2 | आणि एल.जी.एस. व एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर वेतनवृध्दी देण्या संबधित अश्या किती कर्मचा—यांना आपण या लाभापासून वंचीत ठेवले आहे व कधी पासून त्यांची नेमकी संख्या ? याबाबत वेतनवृध्दी न देण्याबाबत कुणाचे आदेश असल्यास त्याची सत्य प्रत उपलब्ध करून देण्यात यावी? | नागपूर महानगरपालिकेच्या सर्व विभागाकडून प्राप्त माहितीनुसार एल.जी.एस./ एल.एस.जी.डी.ची परिक्षा उत्तीर्ण केलेले परंतू वेतनवृध्दी लागु न झालेले एकुण 54 कर्मचारी आहेत.<br>6 व्या वेतन आयोगाचे शिफारसीतील क्रमांक 28 ( 3.6.3 व 3.25.1) नुसार काही पदांना सेवाप्रवेशाच्या वेळी देण्यात येणारे उच्च प्रारंभिक वेतन तसेच शैक्षणिक अर्हतेच्या आधारावर मंजुर करण्यात येणा—या वेतनवाढी यापुढे अनुज्ञेय असणार नाहीत असे नमूद आहे. व ही शिफारस स्विकृत करण्यात आली आहे. प्रत सोबत जोडली आहे. |
| 3 | महाराष्ट्र शासनानी निर्गमित केलेल्या 6 व्या वेतन आयोगात वाढीव वेतवृध्दी | 6 व्या वेतन आयोगाचे शिफारसीतील क्रमांक 28 ( 3.6.3 व 3.25.1) नुसार काही पदांना सेवाप्रवेशाच्या वेळी देण्यात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | न देण्याबाबत कुणाचे आदेश असल्यास त्याची सत्य प्रत उपलब्ध करून देण्यात यावी. | येणारे उच्च प्रारंभिक वेतन तसेच शैक्षणिक अर्हतेच्या आधारावर मंजुर करण्यात येणा–या वेतनवाढी यापुढे अनुज्ञेय असणार नाहीत असे नमूद आहे. व ही शिफारस स्विकृत करण्यात आली आहे.<br>महाराष्ट्र शासन वित विभागाचे 6 व्या वतन आयोगाच्या शिफारशी स्विकृत करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक वेपुर–1209/प्र.क्र. 20 /सेवा –9 दिनांक 27 फेबुवारी 2009 सोबत जोडला आहे.<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १८-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- निर्भय जैन**
**उपायुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ४) | १९० | श्री. सतीश विठ्ठलराव होले | |

| अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. ३१ येथील सिमेंट रोडची कामे करतांना काय निकष लावलेत हया संदर्भात प्रश्न | प्रभाग क्र. ३१ येथे सिमेंट रोडचे कामे करतांना पुढील प्रमाणे निकष लावलेले आहेत :-<br>१) महानगरपालिकांच्या मुलभुत सोयी सुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदानातील निवड केलेले रस्ते त्याकरीता निकष<br>अ) प्रमुख वर्दळीचे रस्ते ब) प्रमुख मौठया रस्त्यांना जोडणारे रस्ते क) जुन्या सिमेंट रोडांना जोडणारे रस्ते<br>२) महानगरपालिका अर्थसंकल्पात सिमेंट रोड करीता तरतूद व मा. स्थायी समिती यांनी दिलेल्या मंजुरीनुसार.<br>३) अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतूद लक्षात घेवून टप्पा-टप्पाने मा. आयुक्त स्तरावर दिलेल्या मंजुरीनुसार<br>४) रिंग रोडच्या आतील मुख्य रस्ते<br>५) मा. नगरसेवक/नगरसेविका यांनी रस्ते सुचविल्यानुसार. |
| 2 | नागपूर शहरातील सिमेंट रोड नियमानुसार आहेत काय ? असेल तर प्रभाग क्र. – ३१ मधील एखादा सिमेंट रोड उदा. घेवून प्रशासनाने माहिती द्यावी. | १) होय<br>२) क्रिडा चौक ते तुकडोजी चौक पर्यंत हा रस्ता सिमेंट रोड टप्पा-३ अंतर्गत घेण्यात आलेला असून सध्या काम सुरु आहे. सदर रस्ता ३०.०० मि. रुदीचा असुन लांबी ६९०.०० मि. आहे. नागपूर शहर सिमेंट रस्ता प्रकल्प टप्पा – ३ अंतर्गत असलेल्या सिमेंट रस्त्यांचे संरचना ( Structural Design) विश्वेश्वरैया प्रोदयोगीकी संस्था नागपूर ( व्ही. एन. आय. टी) यांचे कडुन करण्यात आले आहे. त्यानुसार सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम करण्यात येत आहे. |

(मा. आयुक्त यांचे दि. १८-०२-२०२० च्या अनुमतीने)

हस्ता/- अधिक्षक अभियंता (बां)
महानगरपालिका, नागपूर

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>५)</td><td>१९१</td><td>श्री. तानाजी सुकलाजी वनवे</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>१</td><td>नागपूर महानगरपालिकेने शहराच्या सिमे अंतर्गत महामार्गाचे व वसाहतीतील रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्यास कोणत्या वर्षापासुन प्रारंभ केले असुन फेज १ -चे काम पुर्ण झाल्यानंतर फेज २ -व फेज ३ -चे कामास कोणकोणत्या वर्षाला सुरूवात करण्यात आली आहे.</td><td>सिमेंट रस्ते प्रकल्प टप्पा , १ -२ व ३ अंतर्गत नागपूर महानगरपालिकेतर्फे शहराच्या सिमे अंतर्गत महामार्गाचे रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे काम करण्यात आलेले नाही . शहरातील सिमेंट रस्ते प्रकल्पा अंतर्गत टप्पानिहाय कामे पुढील प्रमाणे सुरू करण्यात आली.<br>फेज १२- २०११ - वर्ष - १ -<br>फेज १७ -२०१६ - वर्ष - २ -<br>फेज - ३ -वर्ष १९ -२०१८ -</td></tr>
<tr><td>२</td><td>सिमेंट रस्त्याकरीता प्रत्येक आर्थिक वर्षात किती कोटीची तरतूद करण्यात आली आहे.</td><td>१) टप्पा - १
<table>
<tr><th>वर्ष</th><th>प्रावधान</th></tr>
<tr><td>२०११-१२</td><td>७८ कोटी</td></tr>
<tr><td>२०१२-१३</td><td>६४.२५ कोटी</td></tr>
<tr><td>२०१३-१४</td><td>४० कोटी</td></tr>
<tr><td>२०१४-१५</td><td>९० कोटी</td></tr>
<tr><td>१६-२०१५</td><td>कोटी ३०</td></tr>
<tr><td>१७-२०१६</td><td>कोटी ४०</td></tr>
<tr><td>१८-२०१७</td><td>कोटी २०</td></tr>
<tr><td>१९-२०१८</td><td>कोटी २०</td></tr>
</table>
२) टप्पा - २
<table>
<tr><th>वर्ष</th><th>प्रावधान</th></tr>
<tr><td>२०१६-१७</td><td>२२५ कोटी</td></tr>
<tr><td>२०१७-१८</td><td>२५० कोटी</td></tr>
<tr><td>२०१८-१९</td><td>३०० कोटी</td></tr>
</table>
३) टप्पा-३ चे कामाची प्रकल्प् कींमत रू. ३०१.६७ कोटी असुन सदर्हु प्रकल्प् मनपा, राज्य् शासन व नासुप्र यांचे समसहभागातुन राबविण्यात येत आहे. याकरीता, राज्य् शासन व नासुप्र कडुन प्रत्येकी रू ६२.५० कोटी चा निधी प्राप्त् आहे. तसेच टप्पा २ व ३ करीता आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता रू. ९५.०० कोटी व वर्ष २०१९-</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २० करीता रू. २०० कोटी चे प्रावधान मनपा चे अर्थ संकल्पात केलेले आहे. |
| | | | ३ | कंत्राटदारांना या कामाचे कितीचे भुगतान करण्यात आले आहे. | १) टप्पा १ अंतर्गत कंत्राटदारास माहे मे कोटीचे भुगतान ७४.४६ पर्यंत रूपये २०१९ .करण्यात आले आहे<br>२) टप्पा-२ अंतर्गत आजपावेतो कंत्राटदारास रू. २१३ कोटी चे भुगतान करण्यात आलेले आहे.<br>३) टप्पा-३ अंतर्गत आजपावेतो कंत्राटदारास रू. ५२.९६ कोटी चे भुगतान करण्यात आलेले आहे. |
| | | | ४ | आजपर्यंत नागपूर शहरात किती रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असून या रस्त्याच्या कामाची गुणवत्ता नियमानुसार बरोबर आहे का? | १) सिमेंट काँक्रिट रस्ते प्रकल्प टप्पा १ -अंतर्गत एकुण रस्त्यांचे काम पूर्ण १४ करण्यात आले. (यादी संलग्न) यापैकी संलग्न यादीतील रस्ता क्र. १ व ६ या दोन रस्त्यांची गुणवत्ते बाबतची तपासनी Central Road Research institute, New Delhi यांचे मार्फत करण्यात आलेली असुन त्यांनी सुचविलेल्या उपाययोजना कंत्राटदाराचे Risk and Cost वर करण्यासंदर्भाने कार्यवाही सुरू आहे.<br>२) टप्पा -२ अंतर्गत एकुण ५१ रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आले असुन त्यातील रस्ता क्र. ५ च्या गुणवत्ते बाबतची तपासनी Central Road Research institute, New Delhi यांचे मार्फत करण्यात आलेली असुन त्यांनी सुचविलेल्या उपाययोजनाबाबत निर्णयाची प्रक्रीया सुरू आहे.(यादी संलग्न)<br>३) टप्पा- ३ अंतर्गत एकुण ३९ रस्ते समाविष्ठ असुन त्यापैकी एकाही रस्त्याचे काम पुर्ण झालेले नाही. (यादी संलग्न) |
| | | | ५ | किती रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे काम अपुर्ण आहेत. | १ (टप्पा -१ अंतर्गत ६ .रस्त्याचे काम अपुर्ण आहेत ८रस्त्यांचे काम अंशतअपूर्ण : .आहे (यादी संलग्न)<br>२) टप्पा-२ अंतर्गत ५ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत व ३ रस्त्यांची काम अदयाप सुरू झालेली नाही.<br>(यादी संलग्न)<br>३) टप्पा -३ अंतर्गत एकुण ३९ रस्त्यांपैकी, २७ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत व १२ रस्त्यांची कामे अदयाप सुरू झालेली नाही.<br>(यादी संलग्न)<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १२-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- मनोज तालेवार**
**अधिक्षक अभियंता,**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ७) | १९३ | श्री. कमलेश दिलीप चौधरी | |

| अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांना अंदाजपत्रकातील पदांतर्गत रु. २५.०० लक्ष पेक्षा कमी प्रावधानांच्या नस्त्यांना पत्र देण्याचे अधिकार कोणत्या नियमानुसार प्रस्तावित करण्यात आले आहे व का? | मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना मनपा सभा ठराव क्र. २२९ दि. ११/०६/२०१८ नुसार अर्थसंकल्पात विविध विकास कामांतर्गत ठेवण्यात आलेल्या निधीचे विविध कामाकरिता प्रावधान किंवा तरतूद मुक्त करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना प्रदान करण्यात आले आहे.<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ च्या तरतुदींचा विचार करता ही बाब सुसंगत नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ अन्वये स्थायी समिती सभापती यांना अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीचे वितरण करण्याचे अधिकार नाहीत.<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १७-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- राजेश मोहिते**
**उपायुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ८) | १९४ | श्री. मनोज दशरथ सांगोळे | (खालील प्रमाणे) |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | माझे प्रभागातील मौजा — नारी, ख. क्रं.87/2,109 - 110/ 2,3 , 113/1 , 113/3 येथे बांधण्यात आलेल्या बीएसयुपी - पीपीपी अंतर्गत घरकुल प्रकल्प व प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रं. 3 येथे बांधण्यात आलेले आहे. नागरीकांना रस्ता नसल्यामुळे व कामात अंदाजे रु. 7.74 कोटी इतका खर्च करण्याकरीता प्रस्ताव तयार झाले असून या कामाकरीता खर्च म.न.पा. पद क्रं. A47601360601 (झोपुप्रा — बीएसयुपी / पीएमएवाय) या पदामधून खर्च होणार असून या कामास डी.पी. 24, 18 व 12 मीटर रस्ता दाखविण्यात आलेला आहे. परंतू जागेवर रस्ता बणविलेला नसतांनी सुध्दा या क्षेत्रात एकूण 778 सदनिका G + 4 मजल्यांचे बांधकाम झालेले आहे. तसेच काही नागरीकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत आवंटीत केलेले आहे. त्यांना रोजगाराकरीता व इतर सुखसोयीकरीता शहरात यावे लागते. परंतू रस्ता नसल्यामुळे या नागरीकांची अतिशय गैरसोय होत आहे. प्रस्तावित काम जलद गतीने व्हावे या हेतूने विभाग प्रमुखाने व्यक्तीश: लक्ष घालून नागरीकांना किती दिवसात कारवाई होईल याची माहिती सभागृहात देण्यात यावी. | नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नागपूर तर्फे बीएसयुपी प्रकल्पाअंतर्गत मौजा -नारी ख.क्रं.109 - 110/ 2, 3 येथे 544 घरकुले (G+3) पायाभूत सुविधेसह बांधण्यात आली आहेत तसेच मौजा — नारी ख.क्रं. 87/2 येथे 234 घरकुले (G+4) बांधण्यात आली आहेत या रहिवास्याकरिता तात्पुरता रस्ता तयार करण्यात आला आहे. या भागामध्ये नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण होते नासुप्रला दि.27/06/2011 पासून 01/08/2019 वेळोवेळी डीपी रस्ता तयार करणेसंबंधी पत्र व्यवहार करण्यात आला आहे परंतू नागपूर सुधार प्रन्यासने अद्यापही डी.पी. रस्त्याचे बांधकाम केले नाही.<br>आता नागपूर सुधार प्रन्यासच्या सात योजना महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यामुळे सदर भागात महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. सदर रस्त्याचे काम सुरु करणेपूर्वी संबंधित रस्त्याची जागा अधिग्रहित करणे आवश्यक आहे. त्यामुळे जागा अधिग्रहित करणे संबधीची कार्यवाही सुरु असुन मनपाव्दारे जागा अधिग्रहीत झाल्यावर अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध झाल्यास रस्ता तयार करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल .<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १८-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- कार्यकारी अभियंता,**
**झोपुप्रा**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
| ९) | १९५ | श्री. जितेन्द्र घोडेस्वार | १ | नागपूर म.न.पा सफाई कामगारांच्या ४४०७ वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत दि. २० सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता दि. १३ डिसेंबर २०१९ रोजी स्थायी समिती सभागृहात मा. महापौर यांनी रोजंदारी (ऐवजदार) कर्मचारी यांना ३१ जानेवारी २०२० पावेतो स्थाई करण्यासंबंधी आदेश देण्याचे निर्देश दिलेले होते परंतु ५ महिन्याचा अवधी लोटून सुध्दा म.न.पा प्रशासनाकडुन अजुन पावेतो शासन निर्णयाची अंमलबजावणी कां झाली नाही याबाबत म.न.पा सभागृहात सविस्तर माहिती देण्याबाबत. | महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय दि. २० सप्टेंबर २०१९ नुसार नागपूर महानगरपालिकामध्ये कार्यरत ऐवजदार सफाई कामगार ज्यांचेकडे मुळ ऐवजदार कार्ड असेल त्यांची किमान २० वर्ष नियमित सेवा झाली आहे. त्यांना नागपूर महानगरपालिकामध्ये समावून घेण्याबाबत शासनातर्फे निर्देश प्राप्त आहे. या संदर्भाने दि. १३ डिसेंबर २०१९ रोजी स्थायी समिती सभागृहात मा. महापौर यांनी रोजंदारी (ऐवजदार) कर्मचारी यांना ३१ जानेवारी २०२० पावेतो स्थाई करण्यासंबंधी आदेश देण्याचे निर्देश दिलेले होते. शासनातर्फे प्राप्त निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत मा. आयुक्त यांनी मा. अति आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली १ समिती गठित करुन कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले. त्या अनुषंगाने मा. अति आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दि. २८/११/२०१९ रोजी मा. उपायुक्त –II , सहा. आयुक्त सा.प्र.वि, विधी अधिकारी, आरोग्य अधिकारी यांचे समवेत बैठक घेवून प्रथम झोनतर्फे सेवा जेष्ठता यादि तयार करुन सुचना फलकावर प्रकशित करुन त्यांच्याकडे कार्यरत ज्या ऐवजदार सफाई कामगारांची २० वर्षे नियमित सेवा झालेली आहे. त्यांची नस्ती सर्व दस्तावेजासह कार्यालयास सादर करण्याकरीता निर्देश दिले. बैठकी दरम्यान प्राप्त निर्देशाप्रमाणे झोन क्र. १,३,४,व ६ तर्फे एकुण १०२७ पात्र नस्ती प्राप्त असुन नियुक्ती प्रक्रिया सुरु आहे. तसेच यानंतर उर्वरित झोन तर्फे जसे-जसे प्रकरणे प्राप्त होतील पुढिल कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १७-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- राम जोशी**
**अति. आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| १०) | १९६ | श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे | |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | नगपूर शहरातील झोन निहाय अधिकृत बाजारांची यादी | नागपूर शहरातिल झोन निहाय अधिकृत बाजारांची यादी सोबत संलग्न करण्यात येत आहे. (परिशिष्ठ - अ) |
| २ | अधिकृत बाजार निहाय गाळेधारक ओटेधारकांची संख्या | नगपूर शहरातील बाजार निहाय गाळेधारक / ओटेधारकांची यादी संलग्न करण्यात येत आहे. (परिशिष्ठ - ब) |
| ३ | नगपूर शहर विकास आराखडयात आरक्षित बाजाराची झोन निहाय व मौजा निहाय यादी व क्षेत्रफळ | सदर मुद्या नगर रचना विभाग, म.न.पा.शी संबंधित आहे. |
| ४ | किती आरक्षित बाजाराच्या जागा म.न.पा.ने / ना.सु.प्र.ने अधिग्रहीत केल्या व विकसित केल्या | सदर मुद्या नगर रचना विभाग, म.न.पा.शी संबंधित आहे. |
| ५ | शहरातिल अधिकृत झोन निहाय मटन मार्केट किती व कुठे आहे. | मटन मार्केटबाबतची झोन निहाय यादी संलग्न आहे. (परिशिष्ठ - क) |
| ६ | अधिकृत मटन मार्केट मध्ये किती गाळेधारक आहेत | गाळेधारकांची यादी संलग्न आहे. (परिशिष्ठ - ड) |
| ७ | एखाद्या म.न.पा. झोन क्षेत्रात अधिकृत बाजार नसल्यास तेथील नागरीकांना कोणता बाजाराचा वापर करावा. | एखाद्या म.न.पा. झोन क्षेत्रात अधिकृत बाजार नसल्यास तेथील स्थानिक नागरीकांना लगतच्या अधिकृत बाजाराचा वापर करणे अपेक्षीत आहे. **(मा. आयुक्त यांचे दि. १८-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- महेश मोरोणे**
**उपायुक्त (मालमत्ता)**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०२/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|---|
| a) | श्री. सतिश विठ्ठलराव होले | १ | o.c.w.पाण्याचे बिल (Average Bill) किती युनिटचे लावते हयाला शास्त्रीय आधार काय? | सरासरी (Average) पाण्याचे बिल हे नागपूर शहर महानगरपालिका पाणी पट्टी व दर मुल्यांकन आणि वसुली (दुरुस्ती) उपविधी २००९ एप्रिल १६ १५ .मधील बाब क्रअ (i)(ii)<br>{(i) आयुक्तांनी दिलेले मीटर पडताळणी नादुरुस्त किंवा चुकीचे पाणी वापर दाखवीत असल्याचे आढळल्यास मीटर दुरुस्ती मीटर बद /लण्याचे कालावधीपर्यंत मीटर सुरु असतांनाचे मागील बारा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत दर्ज पाणी वापराचे सरासरीने देयक देण्यात येईल .<br>(ii) पडताळणीत खाजगी मीटर नादुरुस्त किंवा चुकीचे पाणी वापर दाखवित असल्याचे आढळल्यास बिलींग सायकलनिहाय पहिले देयक मीटर सुरु असतांनाचे मागील बारा महीने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत दर्ज पाणी वापराचे सरासरीनुसार देयक देण्यात येईलयाप्रमाणे सरासरीचे देयक प्राप्त . झल्याचे तारखेपासून तीन महिण्याचे आत जर नवीन मीटर लावले नाही तर नवीन मीटर लावेपर्यंत पुढील देयके या सरासरीचे दुपटीने देण्यात येतील.} अन्वये देण्यात येते— .राजपत्राची प्रत सोबत टाचण आहे . जोडपत्र १ - |
| | | | प्रभाग क्र ३१ .मधील अनियमीत पाणी पुरवठा व रेंगाळलेली कामे संदर्भात आजपावेतो O.C.W.ला कधी व किती दंड केला आहे काय? | प्रभाग क्र ३१ .मधील कामांकरीता मे .OCWPL यांना दंड आकारलेला नाही. |
| | | | प्रभाग क्र ३१ .रघुजीनगर सोमवारी क्वार्टर येथील/ O.C.W.ची कामे कधी पूर्ण होणार आहे? | प्रभाग क्र ३१ .मधील रघुजीनगर व सोमवारी क्वार्टर येथील OCW ची कामे पर्यंत पूर्ण होतील २०२० मार्च ३१<br>**(मा. आयुक्त यांचे दि. १८-०२-२०२० च्या अनुमतीने)** |

**हस्ता/- कार्यकारी अभियंता (जलप्रदाय)**
**महानगरपालिका, नागपूर**